# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


महाराष्ट्र पोलीस

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११७ /२०२४ दि. १८/०६/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, **कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **'पोलीस शिपाई भरती प्रक्रिया २०२२–२३'** करीता मैदानी चाचणीतील १६०० मीटर धावण्याची चाचणी दि. १९/०६/२०२४ रोजीपासून बाळकुम पाईपलाईन येथे घेण्यात येणार आहे. उमेदवारांची मैदानी चाचणीतील १६०० मीटर धावण्याची सुरूवात दादलानी रोड कडून येणारे पाईपलाईन कडून होवून रूस्तमजी येथील पाईपलाईन येथे समाप्त होणार आहे. सदर वेळी उमेदवार साकेत कडून बाळकुम कडे जाणारा मुख्य रस्ता ओलांडून जाणार आहेत. सदर रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे अखत्यारीत येत आहे. नमूद मार्गावरून आजूबाजूचे परिसरातील रहिवासी सदर मार्गाचा मॉर्निंग वॉकसाठी, पायी ये–जा करण्यासाठी वापर करीत असतात. साकेत कडून बाळकुम कडे जाणारा हा मुख्य रस्ता असून सदर रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असते. सदर मार्ग पोलीस भरती मैदानी चाचणीचे अनुषंगाने पादचाऱ्यांकरीता तसेच वाहतुकीकरीता बंद करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साकेत – बाळकुम मार्गावरील ग्लोबल हॉस्पीटल समोरील पाईपलाईन मार्गे दादलानी रोड कडे जाणारे आणि बाळकुम कडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना **ग्लोबल हॉस्पीटल समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने साकेत बाळकुम रोड येथील महालक्ष्मी मंदिर येथून डावे वळण घेवून नाशिक – मुंबई महामार्गावरून साकेत पंक्चर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) दादलानी रोड कडून पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पीटल कडे येणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना **मल्टिकार वर्कशॉप, तरबेज इंटरप्रायजेस दादलानी रोड समोरील बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन रोड येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने दादलानी रोड, बाळकुम रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) बाळकुम कडून साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा सोसायटी येथून बाहेर पडणारे बाळकुम – साकेत रोड येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने उजवे वळण घेवून लोढा सोसायटी माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) रूस्तमजी समोर पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पीटलकडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना **रूस्तमजी बिल्डींग समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने उजवे वळण घेवून लोढा सोसायटी माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. १९/०६/२०२४ रोजीपासून 'पोलीस शिपाई भरती प्रक्रिया २०२२–२३' मैदानी चाचणी संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ ठाणे, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावी